**फिर्यादीचा पुढील सरतपास वकील श्री. प्रविण म्हात्रे यांचेमार्फत :**

१०. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. निशाणी क्र. ४/ड सोबत मी आरोपीने दिलेला धनादेश दाखल केलेला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. तो चेक त्याने दिला होता. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येते.

११. आरोपीने दिलेला चेक बॅक ऑफ बडोदा, अलिबाग येथे वटण्याकरीता जमा केला असता सदरचा चेक न वटता परत आल्याचा मेमो दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येते.

१२. आरोपीला पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत मी दाखल केलेली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २७** देण्यात येते.

१३. आरोपीला रजिस्टर पोस्टाने पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. २८** देण्यात येते. पोस्टाची पोचपावती दाखल केलेली असून त्यास **निशाणी क्र. २९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. सुधीर पाटील यांचेमार्फत** :

आरोपी व वकीलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर **सबब उलटतपास नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१६/१२/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

( **निशाणी क्र. ३२ कडील अर्जावरील आदेशान्वये** )

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. परेश देशमुख यांचेमार्फत शपथेवर सुरु** :

१४. आरोपीचे संपूर्ण नाव मला माहीत नाही फक्त 'अनिल कुमार' आहे एवढेच मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अनिल कुमार हे नाव मला त्यांच्या मॅनेजरने सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे पूर्ण नाव मला आजपर्यंत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज हजर असलेला आरोपी अनिल कुमार नाही. मॅनेजरचे नाव मोरे होते त्यांनी मला अनिल कुमार दाखवला होता.

१५. सेंटरींगचे सामान घेण्यासाठी अनिल कुमार याचा माणूस आला होता व त्यासोबत मोरे होते. हे म्हणणे खरे आहे की, सामान घेण्यासाठी अनिल कुमार स्वत: आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सामान दिल्याबाबत काही लिहून घेतले नव्हते. सेंटरींग प्लेट परत न केल्याबाबत मी पोलीसांकडे गेलो होतो. पोलीसांनी केस दाखल करुन घेतली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी प्रायव्हेट केस केली असल्याने पोलीसांनी केस घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांकडे गेलो नव्हतो.

(The Aadhaar card of the accused is filed on record. The accused sought to refer to the said document during cross-examination. The learned advocate for the complainant objected to the same, submitting that the witness is neither the author of the document nor was the document produced at an earlier stage. It was further contended that the document does not relate to the transaction in question and, therefore, cannot be referred to during cross-examination. The learned advocate for the accused argued that any document can be referred to while examining a witness and that the

document was sought to be shown only to verify whether its contents were correct or not. Upon perusal of the document, it appears that it is an Aadhaar card which the accused intends to refer to the witness. The complainant is neither the author of the document nor is it part of his previous statement. Moreover, the complainant has no connection with the document, and the document does not relate to the transaction in dispute. Therefore, the document cannot be referred to the witness, and permission to do so is accordingly denied.)

१६. मला हे माहीत नाही की, आरोपीचे खरे नाव अनिल रमेश उकरुळकर असे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीमध्ये लिहीलेला पत्ता चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, चुकून आरोपीच्या पत्त्यावर कोर्टाची नोटीस व समन्स गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी फिर्यादीला कोणतेही देणे लागत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला कोणताही चेक दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, चेक मोरे यांनी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, चेक आरोपीच्या खात्याचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, चेक कोणत्या खात्याचा आहे, कोणाच्या नावाचा आहे याची माहिती मी घेतली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने टपरीवर चेक दिला होता हे मी खोटे लिहीलेले आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा केसशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही चेक दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस केलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.

दिनांक : **०२/०२/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )

मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.